तक्ता "क"

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मध्यम पाटबंधारे प्रकल्प, धुळे यांचे कडुन.**

क्रमांक भूसंपादन/कावि/एस.आर/०६/२०१६ ज्या अर्थी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) म.पा.प्र.धुळे यांना असे वाटते की, या सोबतच्या अधिसुचीमध्ये ज्यांचा तपशील नमुद करण्यांत आला आहे. अशा जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त जमिनी असा करण्यांत आला आहे) उक्त अनुसूचीमध्ये विनीर्दिष्ट करण्यांत आलेल्या सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे.

त्या अर्थी आता भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (यापुढे ज्याचा निर्देश "संपादन अधिनियम" असा करण्यात आला आहे.) हा महाराष्ट्र राज्यात प्रयुक्त असतांना त्याच्या कलम -११ (१) च्या उपबंधान्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यांत येते की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत किंवा असण्याचा संभव आहे.

उक्त जमिनीमध्ये हितसंबंध असणा-या सर्व व्यक्तींना याद्वारे अशी ताकीद देण्यात येते की, उक्त संपादनाच्या प्रयोजनासाठी उक्त जमिनीवर नेमण्यात आलेल्या कोणत्याही भूमापकाच्या किंवा अन्य व्यक्तींच्या कामात त्यांनी अडथळा किंवा व्यत्यय आणु नये. ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेनंतर जिल्हाधिकारी यांची मंजुरी न मिळवता विक्री / भाडेपट्टा / गहाण/ अभिहस्तांतर देवाण-घेवाण याद्वारे किंवा अन्य प्रकारे उक्त जमीनींची विल्हेवाट लावण्या संबंधात करण्यांत आलेले कोणतेही करार किंवा त्यासंबंधात करण्यंात आलेला कोणताही खर्च किंवा सुधारणा संपादन जमिनीच्या अंतिमरित्या संपादन करण्यांत येईल अशा भागासाठी भरपाई निश्चित करणारा अधिकारी संपादन अधिनियमाच्या कलम ११ (४) अन्वये दुर्लभ करील.

उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी आवश्यक आहेत त्याबद्दल नाशिक विभागाच्या आयुक्तांची खात्री होईल तर संपादन अधिनियमाच्या कलम २१ (१) अन्वये तशा अर्थाची एक अंतिम अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात लवकरच प्रसिध्द करण्यात येईल संपादनाचे काम जर अंशत: किंवा संुपर्णत: सोडुन देण्यात येईल. तर ती वस्तुस्थिती महाराष्ट्र शासन राजपत्रात रीतसर अधिसुचित करण्यांत येईल.

उक्त जमिनीचे नकाशे **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मध्यम पाटबंधारे प्रकल्प, धुळे** यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहाण्याकरीता उपलब्ध आहेत.

न.कार्यकारी अभियंता, म.पा.प्र.क्र.१ धुळे यांनी त्यांचे कडील पत्र क्र./धुमप्रवि-१/भूसं/१११६/सन-२०१६ दिनांक ०६/०४/२०१६ अन्वये संपादन अधिनियमाच्या कलम ४० प्रमाणे उक्त जमिनीचे शीघ्र संपादन करण्याची विनंती केली आहे. असे शीघ्र संपादन करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे. सबब मी संपादन अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणे सदर प्रकरणी सामाजिक निर्धारण अभ्यास करण्यात आलेला आहे.

सदर अधिसुचनेबाबत ज्या हितसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदवावयाच्या आहेत त्या अधिसुचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासुन ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) म.पा.प्र.धुळे यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

**ज्यासाठी जमिन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन :-** मौजे लामकानी, बेहेड व रामी ता.शिंदखेडा उजवा मुख्य कालवा सांडवा क्र. ४२६० ते १०२००

दिनांक :-२५/४/२०१७
स्थळ :- धुळे

(रवींद्र भारदे)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
म.पा.प्र.धुळे

परिशिष्ट - १

जमिनीचा तपशिल

गावाचे नांव :- मौजे लामकानी, रामी ता. जि.धुळे

| अ.क्र. | गट नंबर | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) | |
|---|---|---|---|
| | | ला. ला. | पो. ख. |
| मौजे लामकानी | | | |
| १ | ३५२ | ०.१४ | ०.०० |
| २ | ३५१/३ | ०.२८ | ०.०० |
| ३ | ३५१/२ | ०.२९ | ०.०० |
| ४ | ३४९/१ | ०.१२ | ०.०० |
| ५ | ३४९/२ | ०.०९ | ०.०० |
| ६ | ३४९/३ | ०.४९ | ०.०० |
| ७ | ३४८ | ०.२५ | ०.०० |
| ८ | ३४७/१ | ०.१९ | ०.०० |
| ९ | २९२ | ०.१० | ०.०० |
| १० | २८२ | ०.०९ | ०.०० |
| ११ | २८१ | ०.११ | ०.०० |
| १२ | २९१ | ०.०१ | ०.०० |
| १३ | २९० | ०.०२ | ०.०० |
| १४ | २८९ | ०.०४ | ०.०० |
| १५ | १०२ | ०.०२४ | ०.०० |
| १६ | १२० | ०.२४ | ०.०० |
| १७ | ३६२ | १.२२ | ०.०० |
| १८ | ३६४/१/क | ०.६८ | ०.०० |
| १९ | ३५३ | ०.६५ | ०.०० |
| २० | ३६/२-१ ब ६ | ०.१९ | ०.०१ |
| २१ | ३६/२-१ ब २ | ०.५७ | ०.०० |
| २२ | ३४४ | ०.०५ | ०.०० |
| २३ | ३४३ | ०.०७ | ०.०० |
| २४ | २८८ | ०.५७ | ०.०० |
| २५ | २८३ | ०.०८ | ०.०० |
| २६ | ८७ | ०.४९ | ०.०३ |
| २७ | १०० | ०.०५ | ०.०० |
| २८ | १०१ | ०.९८ | ०.०० |
| २९ | ७१ | ०.०८ | ०.०० |
| ३० | १०८/२ | ०.२१ | ०.०० |
| ३१ | ११६ | ०.०१ | ०.०० |
| ३२ | १२१ | ०.१७ | ०.०० |
| ३३ | ११९/२ | ०.०७ | ०.०० |

| अ.क्र. | गट नंबर | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) | |
|---|---|---|---|
| | | ला. ला. | पो. ख. |
| मौजे रामी | | | |
| १ | १३४/१अ | ०.४९ | ०.०० |
| २ | १३४/३ | ०.४० | ०.०० |
| ३ | १३५/१ | ०.२३ | ०.०० |
| ४ | १३५/१ब | ०.२३ | ०.०० |
| ५ | १३५/२अ | ०.५५ | ०.०२ |
| ६ | १४३/१ | ०.१९ | ०.०४ |
| ७ | १४३/२ | ०.२२ | ०.०० |
| ८ | १४३/३ | ०.२२ | ०.०० |
| ९ | १४२/२ | ०.०८ | ०.०० |
| १० | १४२/४ | ०.४४ | ०.०१ |
| ११ | १४१/२ब | ०.८० | ०.०० |
| १२ | १४१/१ | ०.५५ | ०.०० |

## परिशिष्ट - २

## सार्वजनिक प्रयोजनाबाबत तपशिल

प्रकल्पाचे नांव :- वाडी शेवाडी मध्यम प्रकल्प

प्रकल्पाचे प्रयोजन :- मौजे लामकानी, बेहेड व रामी ता.शिंदखेडा उजवा मुख्य कालवा सांडवा क्र. ४२६० ते १०२०० साठीचा **पुरवणी प्रस्ताव**

## परिशिष्ट - ३

## विस्थापनाबाबत तपशिल

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती / कुटुंब राहत्या घरातुन विस्थापित होणार नसल्याने विस्थापनाबाबत तपशिल निरंक आहे.

## परिशिष्ट - ४

## सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाचे निष्कर्ष

वाडी शेवाडी प्रकल्पांतर्गत धुळे आणि शिंदखेडा तालुक्यातील ५ हजार ९८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याचे प्रस्ताविक आहे. त्यामध्ये तालुका निहाय अनुक्रमे ३ आणि १ गावांचा समावेश आहे. या गावांचा सिंचन क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीला मोठा फायदा होणार आहे. उपजिवीकेचे साधने वाढुन अन्न सुरक्षेची हमी मिळणार आहे. तसेच अर्थव्यवस्था सुधारायला मोठा वाव मिळणार आहे. म्हणुन सदर प्रकल्प आणि त्याअंतर्गत करावयाची कामे लवकरात लवकर हाती घेण्यात येउुन प्रकल्प पुर्ण करण्याची शिफारस पुर्ण करण्यांत येत आहे.

## परिशिष्ट - ५

## प्रशासक नियुक्तीचा तपशिल

प्रस्तुत प्रकरणी एकही व्यक्ती / कुटुंब विस्थापित होत नसल्याने पुर्नवसन व पुनर्स्थापना प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

दिनांक :- २५ / ०४ /२०१७
स्थळ :- धुळे

(रवींद्र भारदे)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
म.पा.प्र.धुळे